सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(0240)2334216(P) 2334769(O) Fax-2356820
**http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com**
आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त


जाक्रं विकाऔ/शिक्षण/२०११/८०२९
दिनांक 1 ऑक्टो २०११

**प्रति,**
**प्राचार्य,**
**विना-अनुदानीत पदव्युत्तर पदवी एमबीए आणि एमसीए,पदवी पदविका**
**अभियांत्रिकी/औषधनिमार्णशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्था**
**औरंगाबाद विभाग.**

विषय :- आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ५० टक्के शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

**उपरोक्त संदर्भिय विषयानुसार २०११-१२ या शैक्षणिक वर्षासाठी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या** आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या **शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीसाठी** विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र (अ)मध्ये दिनांक १०/१०/२०११ मध्ये पाठवावी.

प्रतिपूर्ती तपासणीचा कार्यक्रम या कार्यालयाच्या वेबसाईटवर ( **http://www.dteau.org**) स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

इबीसी सवलतीचे अर्ज तपासणीसाठी दिलेल्या वेळापत्रकानुसारआपल्या संस्थेचा संबधित प्रतिनिधी या कार्यालयात प्रतिनियुक्त करण्यात यावा.तपासणीच्या वेळी अर्जासोबत खालील कागदपत्रे आवश्यक राहतील. विद्यार्थ्यांची प्रकरणे पडताळणीसाठी सादर करतांना त्या सोबतच्या प्रपत्र (ब)मध्ये दोन प्रतित सादर करावे.

**१)विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क सवलतीसाठी विहित नमुंन्यातील अर्जासोबत** संबंधित तहसिलदारांचे २०१०-११ या अर्थिक वर्षाचे रू.एक लाख मर्यादे पर्यंतचे उत्पन्न प्रमाणपत्र जोडावे. (अन्य कोणत्याही व्यक्तीने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही)

**२)प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्याची शैक्षणिक पात्रतेची** प्राचार्यानी साक्षांकित केलेली गुणपत्रिका व शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत **जोडावी.**

३)द्वितीय वर्ष ते अंतिम वर्ष **विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांच्या** मागील शैक्षणिक वर्षामध्ये दिलेल्या परिक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित सत्यप्रत जोडावी.